# पंचायतराज व्यवस्थेतील महिला सरपंचांची राजकीय वाटचाल

**अजित कृष्णा डवरी,** संशोधक विद्यार्थी राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

.....................................................................................

**प्रस्तावनाः**

महिलांच्या राजकीय सहभागाबाबत विचार करता असे लक्षात येते की, भारतामध्ये जवळपास अर्धी लोकसंख्या महिलांची आहे. त्यामुळे राजकीय क्षेत्रात केवळ पुरुष कार्यरत असतील तर देशाची आर्धीच लोकसंख्या सक्षम होईल म्हणून पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांचा सहभाग राजकारणामध्ये वाढणे ही काळाची गरज बनली आहे, म्हणूनच ७३ व्या घटना दुरुस्तीने ३३ टक्के आरक्षण देऊन महिलांना राजकारणात प्रवेश मिळवून दिला.

सुरुवातीला स्त्रियांच्या राजकीय निर्णय निर्धारण प्रक्रियेत पुरुषांचा प्रभाव दिसून येत होता. हळूहळू हा प्रभाव कमी होत गेला आहे. आज महिलांना पुरुषांच्या बरोबरीने संधी मिळत आहे. या संधीचा फायदा घेऊन येणाऱ्या अडचणींचा विचार करुन महिलांचा राजकीय सहभाग नक्कीच वाढणार आहे. या अनुषंगाने महिलांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होईल. तसेच राष्ट्राच्या विकासाची धुरा सक्षमतेने सांभाळण्यासाठी त्यांचे राजकीय सबलीकरण वरच्या पातळीवरती पोहचलेले दिसेल. या अपेक्षेने पंचायतराजव्यवस्थेत महिलांचा सहभाग व नेतृत्व वाढवण्याचा विचार पुढे आला आहे. याबरोबरच महिलांचा राजकीय सहभाग व नेतृत्व यातील प्रगल्भता हा भारतीय लोकशाहीच्या सत्ताविकेंद्रीकरणात व विकासात महत्वाची व निर्णायक भूमिका पार पाडू शकतात.

महाराष्ट्र शासनाने २१ एप्रिल २०११ पासून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रीयांसाठीचे ३३ टक्के आरक्षण होते ते वाढवून ५० टक्के इतके केले आहे. त्यामुळे सर्वच स्तरातील स्त्रीयांचा राजकारणातील सहभाग वाढला आहे. त्याचबरोबर महिला आरक्षणाची अंमलबजावणी झालेपासून जवळपास ४—५ पंचवार्षिक निवडणूका पार पडल्या आहेत. त्यातून महिला नेतृत्व आणि राजकारणाचे एक सकारात्मक चित्र पहायला मिळत आहे. विशेषतः कुटुंबामध्ये राजकीय पार्श्वभूमी असणाऱ्या व नसणाऱ्या स्त्रीया सक्षमपणे राज्यकारभारात सहभागी होत आहेत. उच्चशिक्षित व शहरी भागातील स्त्रीया प्रचलित व पुरूषसत्ताक राजकारण झुगारून देवून स्वतःचं नेतृत्व सिद्ध करत आहेत.

ग्रामीण भागातील किमान शिक्षण घेतलेल्या स्त्रीया राजकारण आणि राजकीय पदांच्यामुळे अनुभवसंपन्न झाल्या आहेत. शिवाय आपले राजकीय पद आणि पदाच्या अधिकारावर ठामपणे दावा सांगत आहेत. पुरूषसत्ताक राजकारणाची आव्हाने स्वीकारून स्वतःची स्वतंत्र निर्णयप्रक्रिया राबवत आहेत. या निर्णय प्रक्रियेमुळे महिला राजकारणामध्ये एक नवीन प्रवाह उदयास आलेला आहे.

एक माणूस एक मूल्य या लोकशाही विचारप्रणालीने स्त्रियांना व पुरुषांना निवडणूकीत मतदानाचा व सहभागाचा समान हक्क मिळाला आहे. भारतात १९५२ च्या पहिल्या निवडणूकीपासूनच स्त्री पुरुषांना राजकीय समान हक्क प्रस्थापित झाला आहे. असे असले तरी स्त्रियांच्या बाबतीत उमेदवारी देताना ते पदाच्या अधिकारापर्यंत ही स्त्री—पुरुष समानता पाळली जात नाही, तरीही महिला राजकीय आरक्षणामुळे या परिस्थितीत थोडा फार बदल घडून आला आहे.

महाराष्ट्रातील ग्रामपंचायत, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका यामधून स्त्रिया बहसंख्येने सहभागी होताना दिसतात. कोकणातील अनेक मतदार संघात पुरुष उमेदवारांपेक्षा स्त्री उमेदवारांची संख्या जास्त दिसते. याचबरोबर जिल्हा परिषद या महानगरपालिकेतील सर्वोच्च व महत्वाची पदांवर महिला अधिक संख्येने दिसतात.

महिलांना राजकीय आरक्षण दिल्यामुळे महिला नेतृत्व आणि राजकारणाचे सकारात्मक चित्र दिसत आहे. परंतु दुसऱ्या बाजूला स्त्रीयांचा राजकीय सहभाग, नेतृत्व आणि निर्णय प्रक्रियेमध्ये पुरूषसत्ताक राजकारणाचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. विशेषतः स्त्रीयांना निवडणूकीत उमेदवारी देणेपासून ते पदाधिकारी म्हणून निर्णयप्रक्रियेमध्ये स्त्री राजकारणामध्ये प्रचलित पुरूषसत्ताक राजकारणाचा अडथळा हे आव्हान बनले आहे. त्यामुळेच ग्रामीण स्तरावरील महिला सरपंच ते उच्च स्तरावरील प्रत्येक पदावरील स्त्री नेतृत्व हे पुरूषसत्ताक राजकारणामुळे दबलेले आहे. हे वास्तव नाकारता येणारे नाही.

- **शोधनिबंधाची उद्दिष्टे:**

१) महिला सरपंचांच्या राजकारणातून नेतृत्व घडले का? याचा अभ्यास करणे.

२) महिला सरपंचांच्या राजकारणातील नवीन प्रवाहांचा अभ्यास करणे.

- **संशोधन पद्धती:**

प्राथमिक साधनामध्ये ३८ महिला सरपंचांच्या प्रत्यक्ष मुलाखती, सर्वेक्षण पद्धती, प्रश्नावली पद्धती, महिला सरपंचांची अधिवेशने, सभा या घटकातून सहभागी निरीक्षणातून अभ्यास केला आहे.

दुय्यम साधनांमध्ये महिला सरपंच कार्यपद्धती, निर्णयनिश्चिती प्रक्रिया, महिलांचे राजकारण याबाबत प्रकाश टाकणारी लेखकांची प्रकाशित पुस्तके, लेख, जुनी संशोधने, मासिके, नियतकालिके, वार्षिक अंक, विशेषांक, वर्तमानपत्रे तसेच इंटरनेट या माध्यमातून संशोधनासाठी माहिती संकलित केली आहे.

**१. महिला राजकीय आरक्षण व सबलिकरण:**

महिलांचा राजकारणातील सहभाग वाढवण्याच्या हेतूने ७३ वी व ७४ वी घटनादुरूस्ती ही एक निर्णायक राजकीय घडामोड होती. त्यातून महिला सबलीकरण, राजकीय ज्ञान, प्रशासकीय ज्ञान व नेतृत्वातील प्रगल्भता या बाबी साधल्या गेल्या. शिवाय महिलांचे नवे नेतृत्व राजकारणात विकसित झाले. या नेतृत्वाने सुरूवातीला प्रचलित राजकारणाचा व राजकारण्यांचा आधार घेतला. परंतु नंतरच्या काळात स्वत:च्या अनुभवातून, स्वत:चे निर्णय घेतले. त्यामुळे स्त्रियांचे नवे नेतृत्व व नवी निर्णयप्रक्रिया यांचे प्रारूप समोर आले. विशेषत: स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ग्रामपंचायत पातळीवरील महिलांचा राजकीय सहभागातून महिला सरपंचांच्या राजकारणाचा एक नवा प्रवाह उदयास आला.

स्त्रीयांचे किंवा महिला सरपंचाचे राजकारण हया संकल्पनेकडे व्यापक दृष्टीने बघणे गरजेचे आहे. स्त्रीयांच्या समान स्थान, सन्मानासाठी, हितसंबंध रक्षण करणे, त्यांना न्याय संधी देणे त्यासाठी आवश्यक ते वातावरण देण्यासाठी कृती करणे आणि निर्णय प्रक्रियेत समान सहभाग या संदर्भात त्याकडे बघावे लागेल. यादृष्टीने पाहता महिला सरपंचांच्या राजकारणाची आणि नेतृत्वाची सद्यस्थिती काय दिसते. हे पहाता असे दिसते की, स्त्रीया समान मानल्या जात नाहीत कारण स्त्रीयांना जाती, धर्म आणि वर्ग, लिंग यामध्येच विभागून बंदीस्त केलेले दिसते. स्त्रीनेतृत्वाच्या विकासात हे घटक आड येतात.

**२. पुरुषप्रधान राजकारणाचे प्रतिनिधित्व:**

राजकारणाचे क्षेत्र पुरुष क्षेत्र मानले जाते. परंतु यामध्ये उच्चजातींचा वरचष्मा अधिक आहे. आरक्षण मिळण्यापूर्वी राजकारणात उच्च जातींच्या महिला सुध्दा जास्त सहभागी नव्हत्या. परंतु आरक्षणानंतर सत्तेतील स्वत:चे स्थान टिकवणेसाठी आरक्षित जागेवर उच्च जातीच्या नेतृत्वाने स्वत:च्या घरातील स्त्रीयांना आणले. या संधीचा फायदा घेवून काही स्त्री नेतृत्वाने स्वतंत्र निर्णय घेतले आणि राजकारणात नेतृत्व सिध्द केले. काही ठिकाणी उच्च कुळातील महिलांना खानदान, चालीरीती यामुळे स्वतंत्र विचार व मनोवृत्तीने सहभाग दाखवता आला नाही. त्यांच्या पती, दीर, पिता, सासरा, भाऊ, यांची प्रतिनिधी म्हणून महिला सरपंचांनी राजकिय नेतृत्व किंवा वावर केला. उच्च कुळातील स्त्रीयांनी आरक्षणामुळे राजकारणात आपली एक जागा निर्माण केली. हि विशेष बाब घडली. पूर्वी राजकिय प्रस्थापित कुटूंबात सुन आणताना फार चळवळी मुलगी चालत नव्हती. परंतु सध्या राजकारणात मुलगी ढकलली तरी बोलू शकेल अशा धाडसी मुलींचा विचार होवू लागला आहे. हा एक प्रगतीचा टप्पा म्हणून पाहता येतो.

**३. सामाजिक चळवळीतून नेतृत्वाची घडण:**

दडपलेल्या व मागासलेल्या जातीतील महिला सरपंचांच्या नेतृत्वांवर पुरुषप्रधान संस्कृतीची बंधने दिसतात. परंतु या स्त्रीयांनी स्वत:च्या परिस्थितीतून स्वत:चे प्रश्न स्वत:च्या राजकारणातून सोडवण्याची जिद्द दाखवून दिली. जातींच्या अस्मिता वाढल्याचा परिणाम स्त्री नेतृत्व व राजकिय सहभागावर किंवा आंकाक्षा तीव्र होण्यात झाला. विशेषत: दलित चळवळी व ओबीसी चळवळींचा परिणाम त्यांच्या स्तरातील महिला सरपंचांच्या राजकारणावर चांगला घडून आला. ग्रामपंचायत मिटींगला उपस्थिती, ग्रामसेवक, तलाठी, शहरी अधिकाऱ्यांना जाब विचारणे, यामधून महिला सरपंचांच्या नेतृत्व घडतांना दिसले. तरीही गावचा विकासामध्ये सदस्य, ग्रामस्थ किंवा सरकारी नोकरशाहीचे मागावर्गीय स्त्रीयांना योग्य सहकार्य मिळत नाही. त्यासाठी महिलांना झगडावे लागते. ते कटू सत्य आहे. याशिवाय अल्पसंख्य स्त्रीयापैकी मुस्लिम व ख्रिश्चन स्त्रीयांचे राजकारणातील स्थान अतिशय नगण्य दिसून येते.

**४. नेतृत्वाची आधुनिक दृष्टी:**

महिलांच्या राजकीय आरक्षणाला व सहभागाला बराच कालावधी पूर्ण झाला आहे. त्यातुन महिलांचे नेतृत्व सक्षमतेने पुढे आले आहे. महिलांनी गावातील प्रश्न, पर्यावरण प्रश्न, स्त्री प्रश्न याबरोबरच स्वत:चे अधिकाराबाबत जागृकपणे कार्याला सुरूवात केली. त्यातून स्त्री नेतृत्व हे प्रस्थापित पुरूष नेतृत्वाच्या बरोबरीने आत्मविश्वासाने पुढे येताना दिसते. तसेच आपल्या न्याय्य हक्कांसाठी व अस्तित्वासाठी प्रस्थापित राजकीय यंत्रणेबरोबर संघर्ष करण्याची त्यांची तयारी असलेली दिसते. नियंत्रित प्रशासन व अभ्यासपूर्ण माहिती या बाबी प्रशिक्षणातून शिकून स्त्रीयांनी आपल्या नेतृत्वाला नवे आयाम दिले आहेत. तसेच स्वत:चे नेतृत्व नव्याने प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. स्त्री सुधारकांच्या आदर्श व प्रेरणेतून आपल्या नेतृत्वाची जडणघडण करण्याचा मनोदय नव्या नेतृत्वाकडून व्यक्त होताना दिसतो. हे नेतृत्व आरक्षण मिळाल्यामुळे सर्व जाती, धर्म तसेच विविध सामाजिक स्तरातून पुढे येताना दिसते. या नेतृत्वाने स्वत:च्या विचार व कर्तृत्वाने राजकीय सक्षमता प्राप्त केलेली दिसते. केवळ स्वत:चा विचार न करता सर्व महिला व भावी पिढया या राजकारणामध्ये आत्मविश्वासाने आल्या पाहिजेत. व लोकशाही व्यवस्थेतील सर्व पदांच्या अधिकार सत्तेवर त्यांच्या कार्याचा व निर्णयाचा ठसा उमटवू शकतील असा दृढ विश्वास स्त्री नेतृत्व व्यक्त करताना दिसते. याशिवाय प्रशासकीय अनुभवातून निवडणूक प्रक्रिया व राजकीय अधिकारांतील बदलांबाबत अभ्यासपूर्ण मते मांडताना दिसतात.

**५. नेतृत्वाच्या खाजगीपणाची संकल्पना:**

जे जे खासगी ते ते राजकिय अशी व्याख्या स्त्रीवाद्यांनी राजकारणाची केली आहे. प्रस्तुत प्रकरणात जे जे खासगी ते ते राजकिय अशा गोष्टी विविध अंगानी दिसून येत आहेत. कारण खासगी संपत्ती हिच संकल्पना स्त्रियांच्या बाबतीत आजही लागू आहे. त्यामुळे पुरुषप्रधान समाजात स्त्रियांना खाजगी मालमत्ता मानण्याचा कल आजही दिसून येतो. प्रस्थापित राजकारणातील पुरुष हे पदावर गेलेली स्त्री ही आपली मालमत्ता समजतात. तसेच त्या स्त्रिच्या पदालादेखील हे पुरुष, आपली खाजगी मालमत्ता समजतात. याकडे पाहता खाजगी ‘अवकाश’ ही सुझान ओकीन यांची संकल्पना स्थानिक राजकारणातून अभिव्यक्त होताना दिसते हि संकल्पना पितृसत्ताक रचना, नातेसंबंध अशा विविध घटकांमधून दिसून येते. त्यामुळे जे जे खासगी ते ते राजकिय असादेखील स्त्री राजकारणाचा अर्थ लावला जात आहे. सार्वजनिकतेच्या दाव्यात खाजगी विश्वाचा समावेश करुन राजकारणाला व्यापक बनवण्याची प्रक्रिया घडताना दिसते.

‘महालक्ष्मी सरस २०१०’ या प्रदर्शनाच्या उद्‌घाटनावेळी तत्कालीन उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी म्हटले होते की, भारतीय संस्कृतीत आपण महिलांना लक्ष्मी मानतो पण तिच्या हातात आर्थिक सत्ता देत नाही. महिलांना आपण सरस्वती मानतो पण मुलींच्या शिक्षणावरचा खर्च आपल्याला भविष्यची गुंतवणूक वाटत नाही. महिलांना आपण रणरागिनी म्हणतो पण तिला व्यक्त होण्याचे स्वत:चे मत मांडण्याचे स्वातंत्र्य आपण देत नाही. भुजबळ यांच्या कथनामधील परिस्थिती आज नाही असे धाडसाने म्हणता येणार नाही.

**६. नेतृत्व वाटचालीतील वारसा व पार्श्वभूमी:**

ग्रामपंचायत निवडणूकांमध्ये निवडून आलेल्या महिला सरपंचांना निवडणूकांमध्ये उमेदवारी मिळताना त्यांच्या कुटुंबातील प्रस्थापित राजकारणाची पार्श्वभूमी आणि वारसा तसेच राजकीय पक्ष संघटना व संस्थांमधील सक्रीय सहभाग या घटकांच्यामुळे उमेदवारी मिळण्यास मदत झाली आहे. ‘‘निवडणुकीमध्ये एखाद्या उमेदवारास निवडून येण्यास विविध निकषांचा प्राधान्याने विचार केला जातो. त्यामध्ये त्यांचे सामाजिक स्थान, संघटनात्मक सहभाग, आर्थिक उत्पन्न, शैक्षणिक—सामाजिक दर्जा त्यामुळे या घटकांची पुर्तता केवळ प्रस्थापित राजकीय कुटुंबांच्यामध्येच होवू शकते. त्यामुळे साहजिकच महिलांना उमेदवारी देताना आणि निवडून आलेनंतर व सरपंच पदाच्या स्पर्धेमध्ये हेच निकष अर्थपूर्ण ठरतात.’’

ग्रामीण राजकारणातील महिला नेतृत्वाचा भौतिक पाया पोकळ आहे. त्यामुळे त्यांचे स्थानिक राजकारणावर नियंत्रण नसते. ग्रामीण भागातही पितृसत्ताक ही संकल्पना समाजातील पुरुषप्रधान व्यवस्थेला दाखवून देते. पितृसत्ताक याचा अर्थ कुटूंबातील पुरुषप्रमुखाची सत्ता असा आहे. म्हणजेच कुटूंबातील स्त्रिया, मुले, यांच्यावर पुरुषसत्तेचे नियंत्रण असते. पुरुष घरातील आपल्या सत्तेचा संबंध समाजातील सत्तेशी जोडतो. त्यामुळेच महाराष्ट्रातील ग्रामीण राजकारणातही पुरुषांचा प्रभाव अधिक दिसतो.

त्यामुळे अशा पितृसत्ताक प्रस्थापित राजकिय कुटूंबातून महिलांच्या राजकारणाला सुरुवात होते.

**७. प्रगल्भ नेतृत्व आणि स्त्री प्रश्नांची मांडणी:**

स्त्रीयांच्या प्रस्थापित राजकारणातून एकबाब समोर येते की, राजकारणात निवडून आलेल्या स्त्रीयांना स्त्रीयांच्या प्रश्नांविषयी किती निष्ठा आहे, याकडे पाहता त्यांची निष्ठा सर्वप्रथम आपल्या पती किंवा कुटुंबाशी असते. कारण त्यांच्यामुळे राजकीय प्रवेश, निवड या बाबी घडलेल्या असतात. त्यामुळे त्यांनीच घालून दिलेल्या सीमारेषेत काम करणे कुटुंबाचे व पतीचे मत हे स्वत:चे मत बनविणे हे घडताना दिसते. किंबहुना कठपुतळी बाहुल्यांप्रमाणे महिलांचे राजकारण घडत असा प्रत्यय येतो. थोडक्यात उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगांने करवीर तालुक्यातील महिला सरपंचांच्या सर्वेक्षणात या बाबींचा विविध पद्धतीने शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**निष्कर्ष:**

१. राजकारणात असे दिसते की, बहुतांशी स्त्रिया प्रस्थापित राजकीय वारसा असणाऱ्यापैकीच राजकारणात सहभागी झाल्या आहेत. स्थानिक राजकारणामध्ये आर्थिक घटक, सामाजिक घटक व पक्षीय राजकारणाचा प्रभाव दिसतो.
२. स्त्रियांच्या प्रस्थापितांच्या राजकारणामध्ये कौटुंबिक नातेसंबंधाचा प्रभाव प्रामुख्याने दिसतो.
३. स्त्रियांच्या नवीन राजकारणात असे दिसते की, प्रस्थापित पुरूषसत्ताक राजकारणाला आव्हान देवून स्वत:चे पद व पदाचे हक्क सुरक्षित ठेवत आहेत.
४. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणातून महिला सरपंचांचे नेतृत्व विकसित झाले आहे.
५. महिला सरपंच नेतृत्वाने विविध संस्था व बचत गट स्थापन करून त्यांचे नेतृत्व विकसित केले. विविध स्तरावरील संघटनात्मक बांधणीतून महिला नेतृत्व प्रस्थापित राजकारणात स्वत:च प्रस्थापित होताना दिसते.
६. ग्रामपंचायत पातळीवरील विविध विकासकामातील पुरस्कार व सन्मानामुळे महिला सरपंचाची प्रतिष्ठा उंचावली आहे व त्या वेगाने पुढे येत आहेत.

**समारोप:**

महाराष्ट्रातील महिला सरपंचाच्या नेतृत्वाची आजपर्यंतची वाटचाल पाहता पुरुषप्रधान संस्कृती व नेतृत्वाखाली सुरु झाली होती. याकाळात महिला नेतृत्वाने देश व जागतिक पातळीवरील बदलत जाणाऱ्या सर्व घटना व अनुभवातून स्वत:च्या नेतृत्वाची नेव्याने मांडणी केली आहे. प्रस्थापित राजकीय व्यवस्थेशी संघर्ष करुन आपले नेतृत्व सिध्द केले आहे. किंबहूना महिला राजकारणाचे व नेतृत्वाचे नवे प्रारुप निर्माण केले आहे. वारसा परंपरेने राजकीय प्रवेशाची सुरवात केली असली तरी राजकारणावर प्रभाव पाडणाऱ्या सर्व घटकांच्या अनुभवातून त्यांचे नेतृत्व प्रगल्भ बनले आहे. नेतृत्व व राजकारण करताना कौटुंबिक नाते संबंध व समाजाशी नाळ जोडून ठेवली आहे. राजकीय संघर्षाचा परमोच्यबिंदू गाठून, संघर्षाची अस्त्रे वापरुन स्वत:चे पद व पदाचे हक्क सुरक्षित ठेवले आहेत. ग्रामपंचायतीतून नेतृत्वाची सुरवात केली असली तरी अनुभव व क्षमतांच्या आत्मविश्वासातून महिला सरपंचाचे नेतृत्व राष्ट्रीय स्तरावर नेतृत्व करण्याचे इच्छा व्यक्त करताना दिसते.

**संदर्भग्रंथ सूची:**


१. भागवत विद्यूत, (२००७), स्त्री प्रश्नांची वाटचाल, प्रतिभा प्रकाशन, पुणे.
२. बिरवटकर संतोष, (संपा.), (२०१०), राजसत्तेतल्या कारभारणी, महिला राजसत्ता आंदोलन, मुंबई.
३. पवार प्रकाश, (२०१४), भारतीय राजकारण व नेतृत्वाची वाटचाल राजकीय धुरीणत्व, वर्चस्व, डायमंड प्रकाशन, पुणे.
४. पवार वैशाली, (२०१२), महिलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख, डायमंड प्रकाशन, पुणे.
५. पाटील भारती, (२००४), स्त्री शिक्षणाला नवी दिशा मिळण्याची आशा, प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी.
६. पाटील भारती, (२०१४), स्त्रिया: समाज व राजकारण, हर्मिस प्रकाशन, पुणे.
७. विमल पंकजा (संपा.), (२०१७), राजसत्तेतल्या कारभारणी महिला आरक्षणाची पंचविशी, महिला राजसत्ता आंदोलन, मुंबई.